ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख १ आक्टोबर, १९५२ | अंक ४०

## विविध माहिती

**६८ पानांचें दैनिक**—ग्रेटब्रिटनमधील कँटरबरीचे आर्चबिशप डॉ. फिशर नुकतेच अमेरिकेचा दौरा करून परत आले. अमेरिकेंतील कांहीं वृत्तपत्रें रोज ६८ पानांची आवृत्ति काढीत असल्याचें त्यांनीं सांगितलें. ब्रिटनमध्यें कागदाचा तुटवडा असल्यानें बहुतेक वृत्तपत्रें १० पानांपेक्षां मोठीं नसतात, ह्याबद्दल त्यांनीं आनंद व्यक्त केला.

**रामदास बोट वर काढणार**— चार वर्षांपूर्वी मुंबईजवळ समुद्रांत बुडालेली ' रामदास ' बोट वर काढण्याचें काम १५ ऑक्टोबरपासून सुरू करण्यांत येणार आहे. एका ब्रिटिश कंपनीनें हें काम १६ लाख रुपये घेऊन करण्याचें कबूल केलें आहे.

**औद्योगिक पहाणी**— द. महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांची पहाणी करण्याचें कार्य डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशननें करण्याचें ठरविलें आहे. ह्या टापूंतील उद्योगधंद्यांची आकडेवार माहिती मिळविण्यासाठी संस्थेचे चिटणीस श्री. वैद्य ह्यांनीं एक प्रश्नपत्रिका काढली आहे.

**जर्मनीकडून एंजिनें आलीं**—भारतीय रेल्वेजसाठी मागवलेलीं १० रेल्वे एंजिनें घेऊन एक जर्मन बोट मुंबई बंदरांत पोंचली आहे. भारतामधील अरुंद रुळाच्या रेल्वे-मार्गावर तीं धावतील. भारताला मिळालेल्या जर्मन रेल्वे एंजिनांचा हा तिसरा हप्ता आहे.

**इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन**—हैदराबादच्या सरकारनें राज्यांतील मध्यम प्रतीच्या व छोट्या उद्योगधंद्यांना कर्ज देण्यासाठी १ कोटी रुपये भांडवल असणारी इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन काढण्याचें ठरविलें आहे असें समजतें. निम्में भांडवल हैदराबादचें सरकार घेणार असून उरलेलें रिझर्व्ह बँक, शेड्यल्ड बँका, विमा कंपन्या आणि सहकारी संस्था ह्यांच्यामार्फत उभारण्यांत येणार आहे.

### "अर्था"चा दिवाळी अंक
(१८ वें वर्ष)
दरवर्षीप्रमाणें दिवाळीमध्यें प्रसिद्ध होईल. ज्यांनीं अद्याप जाहिराती पाठविल्या नसतील, त्यांनीं त्या त्वरेनें पाठवाव्या.
ता. ८ ऑक्टोबर, १९५२ चा अंक बंद राहील.

**श्री. देशमुखांची सही मिळविण्याची युक्ति**—भारताचे अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख नागपूरला गेले असतां त्यांची सही मिळविण्याविषयीं पुष्कळ जणांनीं प्रयत्न केले होते. तेव्हां त्यांनीं असें सांगितलें होतें कीं सही पाहिजे असणारांनीं मला एक जोडकार्ड पाठवावें म्हणजे मी कार्डावर सही करून पाठवीन. नागपूर येथील एका तरुणानें असें जोडकार्ड पाठविल्यावर त्याला पाहिजे असलेली सही मिळाली.

**नॅशनल म्युझिअमसाठी नवी इमारत**—भारताच्या नॅशनल म्युझिअमसाठी नवी इमारत बांधण्याचा भारतीय सरकारच्या शिक्षण खात्याचा विचार आहे. सध्या हें संग्रहालय राष्ट्रपती भुवनांत आहे. नवीन इमारत बहुधा नव्या दिल्लीच्या क्वीन्स वे ह्या प्रमुख रस्त्यावर होईल.

**भारताला डॉलर्स मिळवून देणारे मासे**—भारताजवळ मच्छीमारी करणाऱ्या सुमारें १ लाख बोटी आहेत. ह्या सर्व बोटींतून ११५ लाख मण सागरी मासे आणि ४५ लाख मण गोड्या पाण्यांतील मासे दरवर्षी पकडण्यांत येतात. गेल्या तीन चार वर्षांपासून ' बॉंबे डक ' ह्या जातीचे मासे अमेरिकेला पाठविण्यांत येत आहेत. अमेरिकन सरकारनें भारताकडून अधिक मासे पुरविण्यासंबंधीं चौकशी चालविली आहे. मोठ्या प्रमाणावर माशांची निर्यात केल्यास डॉलर्स मिळविण्याचा तो एक नवा मार्ग उपलब्ध होईल.

**तंबाखूच्या कचऱ्याचा उपयोग**—पुणें येथील नॅशनल केमिकल लॅबोरेटरीनें तंबाखूच्या कचऱ्यापासून निकोटिन सल्फेट, निकोटिनिक ॲसिड व व्हिटॅमिन बी काढण्याचा शोध लावला आहे. भारतांत तंबाखूच्या कचऱ्याचा कांहीं उपयोग न करतां तो फेकून देण्यांत येत असतो.

**जपानकडून पोलादाच्या भट्ट्या**—जपानच्या एक माजी मंत्र्यांनीं अशी सूचना केली आहे कीं, जपाननें आपल्याजवळील थंड पडलेल्या पोलादाच्या भट्ट्या भारतांत हलवाव्या आणि त्यांच्या बदल भारताकडून बिडाचें लोखंड घ्यावें. सध्यां जपानमधील ४५ टक्के पोलादाच्या भट्ट्यांना काम नाहीं. भारतांत नव्या भट्ट्या बांधण्यापेक्षां ह्या भट्ट्याच भारतांत नेणें स्वस्त पडेल असें त्यांचें मत आहे. जपानला बिडाच्या लोखंडाचा तुटवडा भासत आहे.

**मध्यवर्ती सरकारच्या मंत्र्यांची सोय**—आतांपर्यंत मध्यवर्ती सरकारच्या मंत्र्यांना मोटार घेण्यासाठीं ५ महिन्यांच्या पगारा इतकी रक्कम अगर १०,००० रुपये ह्यांच्यापैकीं कमी असेल तितकी रक्कम कर्ज म्हणून मिळत असे. आतां कर्जाची रक्कम १२,००० रुपयांपर्यंत वाढविण्यांत आली आहे. रकमेची परतफेड ४८ मासिक हप्त्यांनीं करावयाची आहे.

### अमेरिकन चित्रपटांचें ब्रिटनमधील उत्पन्न

ब्रिटनमध्यें दाखविण्यांत येणाऱ्या अमेरिकन चित्रपटांचें उत्पन्न आतां कमी होण्याचा संभव आहे. १९४८ सालीं अमेरिका व ब्रिटन ह्यांच्या दरम्यान झालेल्या कराराप्रमाणें पौंडांच्या बदला डॉलर्स अमेरिकेला देण्यांत येत असत. अमेरिकन बोलपटांना ब्रिटनमध्यें दरवर्षी सुमारें ३,५०,००,००० डॉलर्स उत्पन्न होतें. परंतु त्यापैकीं १,७०,००,००० डॉलर्सच अमेरिकेला पाठविण्याची परवानगी कराराप्रमाणें देण्यांत आली आहे. आतां ह्या करारांत बदल करण्याचे प्रयत्न ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडचे प्रतिनिधी आणि बँक ऑफ इंग्लंडचे प्रतिनिधी करीत आहेत. त्याशिवाय आणखीहि कांहीं डॉलर्सची रक्कम अमेरिकेला पाठविण्याची करारांत सोय आहे. पण ही रक्कम ब्रिटनमध्येंच व ब्रिटिश कामगार कामावर ठेवून चित्रपटानिर्मिती करण्यांत आली तरच अमेरिकेला पाठविण्याची परवानगी होती. ब्रिटिश प्रतिनिधींच्या मतानें दरवर्षी अमेरिकेला पाठविण्यांत येणारी १,००,००,००० डॉलर्सची रक्कम निदान ५०,००,००० डॉलर्सनीं तरी कमी करण्यांत यावी. ब्रिटिश प्रतिनिधींची ही मागणी अमेरिका मान्य करील कीं, नाहीं ही शंकाच आहे. कारण सध्यां हॉलिवुडमधील बोलपटव्यवसायच मंदीच्या तडाख्यांत सांपडला आहे. मेट्रो-गोल्डविन-मायर सारख्या मोठमोठ्या उत्पादकांना सुद्धां आपल्या अधिकाऱ्यांचे पगार कमी करावे लागत आहेत. त्याशिवाय अमेरिकेंत अलीकडे टेलिव्हिजनची लोकप्रियता फार झपाट्यानें वाढत आहे. टेलिव्हिजनच्या आकर्षकतेच्या लाटेंत चित्रपट-निर्मिती कसा टिकाव धरून राहील ह्या चिंतेंत अमेरिकन निर्माते मग्न आहेत.

---

### दि सारस्वत को. बँक लि. मुंबई

वरील बँकेची प्रगति अखंड होत आहे. खेळतें भांडवल गेल्या-वर्षी ७ लक्ष रु. नीं वाढून तें आतां १,२५,०६,९६४ रु. झालें आहे. बँकेकडील ठेवींतील वाढीस अनुसरून बँकेच्या अधिकृत भांडवलांत वाढ करून तें १० लक्ष रु. करण्यांत आलें आहे. आजचें वसूल भांडवल ४,५५,१६० रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ५,५९,२५९ रु. चे आहेत. बँकेनें दिलेल्या ४३ लक्ष रु. कर्जांपैकीं फक्त २½ लक्ष रु. वैयक्तिक तारणावर आहेत. बँकेची दादर, माहिम व पुणें येथें सब ऑफिसेस असून बेळगांव येथें तिची शाखा आहे. बँकेचा बिल्डिंग फंड आतां ६६,१४२ रु. झाला असून, इमारतीच्या घसाऱ्याची अधिक तरतूद करण्याची आवश्यकता आतां नाहीं, असें मॅनेजमेंट कमिटीचें मत आहे. सरकारकडून यावयाचा पगार, पेन्शन, अलावन्स, इत्यादींच्या वसुलीसाठीं बँकेस मान्यता देण्यास मुंबई सरकार तयार असून त्याबाबत व्यवस्था लवकरच होईल. बँकेचे चेअरमन श्री. व्ही. पी. वर्दे ह्यांची अहवालाच्या वर्षी इं. फि. कॉर्पोरेशनचे डायरेक्टर म्हणून निवड झाली. त्याचप्रमाणें, शेती व सहकारी भांडवल पुरवठ्याच्या कॅलिफोर्निया (यु. स्टे.) येथील आंतरराष्ट्रीय परिषदेस उपस्थित रहाण्यासाठी हिंदी शिष्टमंडळाचे ते एक सभासद होते. (चेअरमनः वा. पुं. वर्दे, बी. कॉम्., एफ. आय. बी. (लं.). व्हा. चेअरमनः जी. एम. लाड, बी. कॉम., सेक्रेटरीः एस. व्ही. संझगिरि, बी. कॉम्.)

---

**भोपाळ सरकारला कर्ज**—भोपाळ संस्थानांतील ग्रामोद्योगांचें संवर्धन करण्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें भोपाळ सरकारला ५ लाख रुपयांचें कर्ज दिलें आहे, अशी माहिती संस्थानच्या फडणिसांनीं सांगितली.


## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७५ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन ३२७३८ तारेचा पत्ताः 'PEDNECO' Bombay

---

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिसः पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ४,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.



# अर्थ

बुधवार, ता. १ आक्टोबर, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## प्रतिकूल परिस्थितींत उत्कृष्ट जोपासना

### किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि.

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि. ची सहावी वार्षिक सभा २१ सप्टेंबर रोजीं पुणें येथें भरली होती. त्यावेळीं, कंपनीचे चेअरमन सर श्री राम ह्यांनीं केलेलें भाषण अत्यंत मननीय असें होतें. एप्रिल १९५१—मार्च १९५२ मध्यें ३७ लक्ष रुपयांचीं ऑइल इंजनें विकणाऱ्या व ठराविक दरानें २,९०,९८४ रु. घसारा काढून २ लक्ष, ६४ हजार रुपये नफा मिळविणाऱ्या ह्या यशस्वी कंपनीस सरकारी धोरणाच्या चुकीमुळें कशी अडचण सोसावी लागत आहे, ह्याची त्यावरून कल्पना येते. फेब्रुवारी. १९५२ पर्यंत कंपनीचीं सर्व इंजिनें खपलीं गेलीं, परंतु त्यानंतर मात्र विक्री फारच उतरली. शेतकऱ्यांची मागणी अत्यंत मोठी आहे ह्या कल्पनेनें सरकारनें इंजनांची भरमसाट आयात होऊं दिली होती. लहान डीझेल इंजनांची वार्षिक मागणी ८,००० इंजनांची आहे, पण अशा इंजनांचा देशांतील साठा सुमारें ४०,००० इतका भरेल, असा अंदाज सर श्री राम ह्यांनीं व्यक्त केला. शेतीच्या मालाचे भाव उतरले, त्यामुळें शेतकऱ्यांची इंजनांची मागणी सहाजीकच कमी झाली आणि सार्वत्रिक मंदीचीहि त्यांत भर पडली. कंपनीच्या आवाक्याबाहेरच्या ह्या सर्व गोष्टी असल्यामुळें, कंपनीनें मध्यवर्ती व मुंबई सरकाराकडे मदतीसाठी विनंति केली. राज्यसरकारांनीं शक्य तों स्वदेशी इंजनेंच खरेदी करावीं, अशी सूचना मध्यवर्ती सरकारनें त्यांना तात्काळ केली. मुंबई राज्यसरकारनें कंपनीशीं ४०० इंजनांच्या खरेदीचा करार करून त्यासाठी ४ लक्ष रु. आगाऊ दिले. मुंबई प्रां. सहकारी बँकेनें सोसायट्यांना त्यांच्या सभासदांसाठी इंजनें घेतां यावीं, ह्यासाठी २ लक्ष रुपयांचें मध्यम मुदतीचें कर्ज मंजूर केलें. इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें व एका मोठ्या बँकेनेंहि मदत केली. कारखाना आपली उत्पादनशक्ति सालिना १०,००० इंजनें इतकी वाढविण्याच्या प्रयत्नांत असल्या कारणानें, त्यासाठी स्टोर्समध्यें बरीच मोठी रक्कम गुंतली होती आणि सहाजीकच त्याचा रोकड रकमेच्या तुटवड्यावर परिणाम झाला होता. मे. किर्लोस्कर सन्स आणि कं. कडे कारखान्याचें नेतृत्व आहे म्हणूनच किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि. नें प्रतिकूल परिस्थितींतहि इतर कोणासहि शक्य झालें नसतें एवढें यश मिळवून कारखाना चालू ठेवला आहे आणि चालू परिस्थिति निवळताच पुनः पूर्ववत उत्पादन सुरू होऊं शकेल.

परदेशांवरील अवलंबन दूर करण्याचे चालकांचे प्रयत्न अखंड चालू असून त्यांत त्यांना चांगलें यश येत आहे. हिंदी बनावटीचे सुटे भाग महाग पडत असले तरी तेच वापरण्याचें कंपनीचें धोरण तिला पोषक होईल. त्याबरोबरच भारताच्याहि व्यापक व अंतिम हिताचें तें ठरेल, हें उघड आहे. हळुहळु इंजनांच्या सुट्या भागांतील विदेशी भागांचें प्रमाण उतरत चाललें आहे. फ्युएल इंजेक्शनचा भाग व इतर कांहीं भाग वगळले, तर बाकी सर्व इंजिन आतां पूर्णपणें हिंदी बनावटीचेंच आहे. व्हाइट मेटल बेअरिंजची आवश्यकता ऑइल इंजनांप्रमाणें इतर कांहीं उत्पादनांतहि असते. किर्लोस्करांच्या कारखान्यांत आतां तयार होणारीं बेअरिंग्ज उच्च दर्जाचीं असून, आयात केल्या जाणाऱ्या बेअरिंग्जपेक्षांहि तीं चांगलीं असल्याचें आढळलें आहे. त्यांचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून त्यांची परदेशी बाजारपेठ मिळवतां येण्याजोगी आहे. चालकांच्या ह्या उपक्रमाच्या यशाबद्दल सर श्री राम ह्यांनीं गौरवाचे उद्गार काढले आहेत.

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि. नें चांगला नफा होऊनहि डिव्हिडंड न देतां घसारा फंड वाढवून तो सुमारें ८ लक्ष रु. केला आणि २ लक्ष रुपयांवर रकमेचा रिझर्व्ह फंड निर्माण केला. म्हणजे, भागीदारांना रोकड रक्कम न देतां, कंपनीची मजबुती वाढवून त्यांच्या हिताची दूरदृष्टीनें जोपासना केली, त्याचा फायदा भागीदारांना झाल्याविना रहाणार नाहीं. ऑइल इंजिनांचा दर्जा वाढवून, उत्पादन सुधारून आणि विक्रीनंतरहि इंजिनांकडे लक्ष पुरवून, इंजिनांबद्दल शेतकऱ्यांत विश्वास निर्माण करण्याचें महत्त्वाचें कार्य चालक करीत आहेत. सरकारलाहि ह्या धंद्याच्या महत्त्वाची किंमत पटली आहे, असें दिसतें. अत्यंत अडचणीच्या परिस्थितींतहि ह्या कारखान्यानें उत्पादन कामीं तांत्रिक दृष्ट्या सुयश मिळविलें आहे आणि इतर बाबतींतहि जागरूकपणानें व तारतम्यानें कारखान्याची जोपासना केली आहे. किर्लोस्कर सन्स आणि कं. च्या लायक हातीं कारखान्याचें भवितव्य सुरक्षित असून, त्यांतच देशहितहि साधणार आहे. श्री. शंतनुराव किर्लोस्करांना त्याबद्दल धन्यवाद दिले पाहिजेत.

---

### दि. ब. प्रो. हिरालाल काजी ह्यांचा मृत्यु

प्रो. हिरालाल काजी हे २४ सप्टेंबर रोजीं मुंबई येथें वयाच्या ६६ व्या वर्षी मृत्यु पावले. मुं. प्रां. सहकारी बँक, मुं. प्रां. लँड मॉर्गेज बँक, इत्यादि संस्थांचे ते डायरेक्टर होते. मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटचे ते उपाध्यक्ष होते आणि इंडियन को. कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. प्राग येथील इंटर नॅशनल को. युनियनच्या बैठकीस ते हजर राहिले होते. बॉंबे को. इन्शुअरन्स सोसायटीचे ते संस्थापक—चेअरमन होते आणि मुंबई प्रां. सहकारी मार्केटिंग सोसायटीचें चेअरमनपदहि त्यांस लाभलें होतें. भूगोलाचे व अर्थशास्त्राचे प्राध्यापक, गुजरात कॉलेजाचे प्राचार्य, इंडियन वुइमेन्स विद्यापीठाचे कुलगुरु, ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशनचे उपाध्यक्ष, कोऑपरेटिव्ह प्लॅनिंग कमिटीचे सभासद, बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉर्सचे सभासद, इत्यादि भूमिकाहि त्यांनीं पार पाडल्या. भारतांतील सहकारी संघटनांचें सूत्रीकरण करण्याचे कामीं त्यांना बरेंच यश आलें.

---

**रवींद्रनाथ टागोरांचें स्मारक**— स्वर्गीय रवींद्रनाथ टागोर ह्यांचा अंत्यविधि कलकत्ता येथील ज्या घाटावर करण्यांत आला होता, त्या ठिकाणीं त्यांचें स्मारक करण्याचा विचार रवींद्रभारती ही संस्था करीत आहे. ही सूचना कलकत्त्यांतील प्रमुख नागरिकांनीं एका पत्राच्या द्वारें संस्थेला केली आहे.

## भारतांतील व्यापारी व सहकारी बँका

भारतांत मे १९५२ असेर ५२१ व्यापारी बँका चालू होत्या. यापैकीं एकूण ९९७·२७ कोटी रुपयांची जिंदगी असलेल्या शिडयूल्ड बँका ९३ होत्या व एकूण ६७·६७ कोटी रुपयांची जिंदगी असलेल्या नॉन-शिडयूल्ड बँका ४२८ होत्या. १९३४ च्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टाच्या दुसऱ्या परिशिष्टांत समाविष्ट केलेल्या बँका 'शिडयूल्ड' होत. अशा बँकांचें वसूल झालेलें भांडवल व संचितनिधी मिळून ५ लाखांपेक्षां कमी रक्कम असतां कामा नये अशी एक अट त्यासाठीं पुरी करावी लागते. देशांत व्यापारी बँकांच्या एकूण ४,२०० कचेऱ्या असून त्यांपैकीं २७०० कचेऱ्या शिडयूल्ड बँकांच्या आहेत.

### इंपिरियल बँक

इंपिरियल बँकजवळील ठेवी इतर सर्व शिडयूल्ड बँकांच्या एकूण ठेवींच्या सुमारें १/३ असल्यानें ह्या बँकांत तिचें विशेष स्थान आहे. मुंबई, मद्रास आणि कलकत्ता येथील तीन प्रेसिडेन्सी बँका विलीन करून १९२१ मध्यें या बँकेची स्थापना करण्यांत आली आणि रिझर्व्ह बँकेची स्थापना होण्यापूर्वी सरकारी रोकड शिलकी ठेवणें आणि कांहीं प्रमाणांत जरूर पडल्यास सरकारला पैसा पुरविणें हीं खाजगी मध्यवर्ती बँकेचीं कांहीं कामें इंपिरियल बँकेनें केली. आजही तिचें महत्त्व बरेंच असून, इतर लहान बँकांशीं असलेल्या तिच्या व्यवहारामुळें मध्यवर्ती बँकेच्या खालोखाल तिच्या कार्याचा पसारा आहे. इंपिरियल बँक आणि इतर चार शिडयूल्ड बँका यांचेजवळील एकूण ठेव बाकीच्या सर्व शिडयूल्ड बँकांच्या ठेवींच्या २/३ इतकी आहे.

एक्स्चेंज बँका हा शिड्यूल्ड बँकांमधील एक निराळा गट असून त्या परराष्ट्रांच्या बँका आहेत व परदेशीय व्यापारास भांडवल पुरविणें हेंच त्यांचें मुख्य कार्य असतें. यापैकीं कांहीं बँकांनीं हि इतरही धंद्यांत मोठ्या प्रमाणावर प्रगति केली आहे. भारतांत ३० मे १९५२ रोजीं अशा १५ बँकांचे व्यवहार चालू होते, व त्यांची एकूण जिंदगी २२८·२३ कोटी रु. होती.

भारतांतील बहुसंख्य बँका नॉन-शिडयूल्ड आहेत. परंतु भांडवलाच्या दृष्टीनें त्यांना फार महत्त्व नाहीं. त्यांचेजवळील ठेवींची रक्कम व्यापारी बँकांच्या एकूण ठेवींच्या अवघी १/२० इतकीच आहे.

### सहकारी बँका

निरनिराळ्या राज्यांत सहकारी चळवळीचा प्रमाणशीर विकास झालेला नसला तरी भारतांतील बँकिंग पद्धतींत व्यापारी बँकांच्या जोडीस सहकारी पतपेढ्या हाहि एक महत्त्वाचा घटक आहे. सहकारी बँकांपैकीं राज्यांतील प्रमुख सहकारी बँका राजधानींत, मध्यवर्ती बँका जिल्ह्यांच्या मुख्य ठिकाणीं, बँकिंग युनियन व अर्बन बँका छोट्या शहरांत आणि बहुसंख्य क्रेडिट सोसायट्या निरनिराळ्या खेडेगांवांत असतात. दीर्घ मुदतीचें भांडवल देण्यासाठीं लँड मॉर्टगेज बँका असतात. युद्धोत्तर काळांत सहकारी बँकांनीं प्रगतीचा बराच टप्पा गांठला असून १९५० च्या असेरीस ४०० सहकारी बँकांच्या एकूण ७२५ कचेऱ्या होत्या. त्यांपैकीं २५० कचेऱ्या इतर कोणत्याहि बँका नसलेल्या ठिकाणीं काम करीत होत्या.

नॉन-शिडयूल्ड बँकांची संख्या त्यांचेपेक्षां कितीतरी अधिक असूनही सहकारी बँकांचें भांडवल मात्र त्यांच्या भांडवलापेक्षां अधिक आहे ही विशेष लक्षांत घेण्याजोगी गोष्ट आहे. १९५१ असेर सहकारी बँकांजवळ १०० कोटींची ठेव होती व त्यांनीं ७३ कोटी रुपयांपर्यंत गरजूंना कर्जे दिलीं. त्यामानानें पाहतां नॉन-शिडयूल्ड बँकांपाशीं ६९ कोटी रुपयांची ठेव होती व त्यांनीं ४६ कोटी रुपयांचीं कर्जे दिलीं.

SAVE to help yourself and the NATION
WITH THE
HOME SAFE
THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum

### बँकांकडून मिळणारीं कर्जे

प्रामुख्यानें व्यापार आणि त्या खालोखाल उद्योगधंदे याकरितां बँकांकडून कर्जे देण्यांत आलीं असें निरनिराळ्या बँकांनीं दिलेल्या कर्जाच्या विश्लेषणावरून दिसून आलें. व्यक्तींना व इतर व्यवसायांसाठीही यांपैकीं थोडी रक्कम कर्जरूपानें देण्यांत आली. शेतकीच्या उत्पादनासाठीं दिलेल्या कर्जाचें प्रमाण फारच अल्प म्हणजे एकूण रकमेच्या २ ते ३ टक्के ( सुमारें १५ कोटी रुपये ) आहे. परंतु या क्षेत्रांत सहकारी बँकांचा उपयोग विशेष होतो. नॉन-शिडयूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांत व्यापारास अग्रस्थान असून त्यानंतर उद्योगधंद्याचे व्यक्तींना व इतर व्यवसायासाठीं दिलेल्या रकमेचा आंकडा बराच अधिक आहे. उद्योगधंद्यांना एकूण कर्जरकमेच्या केवळ १/५ इतकीच रक्कम मिळाली. व्यापारासाठीं एकूण रकमेच्या २/५ इतकी व व्यक्तींना आणि व्यवसायांकरितां १/३ इतकी रक्कम मिळाली. छोट्या बँकांनीं बरीचशीं कर्जे सोन्याचांदीचे दागिने गहाण ठेवून दिलीं, यावरून उत्पादक कार्यापेक्षां वापरासाठींच बरींच कर्जे देण्यांत आलीं हें दिसून येतें.

१९४९ च्या बँकिंग कंपनीज ॲक्टान्वयें रिझर्व्ह बँकेला इतर बँकांच्या कर्जमंजुरीच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याचे व्यापक अधिकार मिळाले आहेत. या ॲक्टान्वयें त्या बँकेस केवळ सर्व बँकांना उद्देशून एखादें सूचनापत्र पाठवितां येतें, एवढेंच नसून एकाद्या विशिष्ट बँकिंग कंपनीसाहि सूचना पाठवितां येतात. त्या सूचना कर्ज कोणत्या कारणांसाठीं द्यावें अगर देऊं नये एवढ्यापुरत्याच मर्यादित नसतात, तर तारणावर दिलेल्या कर्जरकमेची मर्यादा व व्याजाचा दर या बाबतींतहि देतां येतात. अशा स्वरूपाच्या सूचना अधूनमधून पाठविण्यांत आल्या आहेत, परंतु अशा सूचनांचें स्वरूप आदेशात्मक नसून नैतिक मार्गदर्शनासारखें असतें.

**नॉर्वेची भारताला मदत**—संयुक्त-राष्ट्रसंघटनेचे उपचिटणीस मि. डेव्हिड ओवेन हे नुकतेचे जिनीव्हाहून ऑस्लो ( नॉर्वे ) येथें गेले. भारताला नॉर्वे जी मदत देणार आहे तासंबंधीं ते विचारविनिमय करणार आहेत. मि. ओवेन हे कौन्सिल फॉर टेक्निकल एड ह्या राष्ट्रसंघटनेच्या संस्थेचे अध्यक्ष आहेत.

## रिझर्व्ह बँकेच्या तपासणीचे सुपरिणाम

दुसऱ्या महायुद्धानंतर बुडालेल्या बँकांवरून यांतील कांहीं बँकांची वाढ घाईघाईनें व अव्यवस्थितपणें झाली असल्याचें दिसून येत असलें तरी या दहा वर्षांत बँकिंग क्षेत्रांत बराच विकास झाला आहे ही वस्तुस्थिति आहे. ही एक इष्ट अशी घटना आहे, कारण अलिकडील काळांत झालेली वाढ लक्षांत घेऊनहि प्रगत अशा पाश्चिमात्य देशांशीं तुलना करतां या देशांतील बँकांची संख्या अजूनही पुष्कळच कमी आहे. भारतांतील ४ हजारांवरील बँक-कचेऱ्यापैकीं प्रत्येक कचेरीचा सरासरी ८२ हजार लोकांस उपयोग होतो तर इंग्लंड व अमेरिकेंतील हेंच प्रमाण अनुक्रमें ५,००० व ७,५०० माणसें असें आहे. यावरून या बाबतींत आणखी बरीच वाढ होण्याची आवश्यकता स्पष्ट होते; तथापि घाईघाईनें काढलेल्या, कोणत्याहि तऱ्हेचें सूत्र नसलेल्या व सट्टेबाजीचें धाडस करणाऱ्या बँका देशांतील बँकिंग पद्धतींचें भयंकर नुकसान करण्याची शक्यता असल्यानें ही वाढ योग्य आणि शास्त्रीय पायावरच झाली पाहिजे.

### रिझर्व्ह बँकेची भूमिका

देशांतील बँकिंगच्या विकासांत रिझर्व्ह बँकेला महत्त्वाची भूमिका आहे. देशांतील मध्यवर्ती बँक म्हणून, सरकारचे बँकर म्हणून आणि देशांतील आणि देशाबाहेरील पैशाच्या व्यवहाराचें निष्कासन-गृह ( क्लिअरिंग हाऊस ) म्हणून रिझर्व्ह बँक देशांतील इतर बँकांची मार्गदर्शक व मित्र या नात्यानें कामगिरी बजावीत असते; कधीं कधीं इतर बँका चुकीच्या मार्गास जाऊं नयेत म्हणून त्यांच्या रक्षणाची कामगिरीही ही बँक करीत असते. त्यासाठी तिला कायदेशीर अधिकारही देण्यांत आले आहेत.

### तपासणीचे अधिकार

बँकांवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार बजाविण्याची रिझर्व्ह बँकेची एक पद्धत म्हटली म्हणजे बँकांची तपासणी ही होय. १९४६ च्या बँकिंग कंपनीज् ( इन्स्पेक्शन ) ऑर्डिनन्सनुसार हा अधिकार रिझर्व्ह बँकेला प्रथम त्याच वर्षी देण्यांत आला व त्यानंतर १९४९ च्या बँकिंग कंपनीज ॲक्टांत तो समाविष्ट करण्यांत आला. या कायद्यानुसार बँकांची नियमितपणें अशी तपासणी करण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेवर पडत नसली तरी आपल्या कामकाजांतील एक नेहमींचा भाग म्हणून हें काम करण्याचें रिझर्व्ह बँकेनें ठरविलें आहे. या कामास मार्च, १९५० मध्यें सुरुवात झाली असून जून, १९५२ अखेर २५१ बँकांची तपासणी झाली आहे. यांतील १६८ बँकांची तपासणी त्यांस बँकिंगचे व्यवहार चालू ठेवण्याकरितां परवाने द्यावेत कीं नाहींत हें ठरविण्यासाठी व बाकीच्या ८३ बँकांची त्यांच्या आर्थिक परिस्थितीचें मूल्यमापन करण्याकरितां आणि कामाच्या पद्धती पाहाण्यासाठी करण्यांत आली. अशा प्रकारच्या नियमित तपासणीखेरीज या बँकेनें इतर ११ बँकांची त्यांच्या कर्जाच्या मुदतवाढीच्या अर्जासाठी, ५ बँकांची त्यांच्या विलीनीकरण योजनांच्या छाननीसाठी व २५ बँकांची त्यांच्या व्यवस्था-योजनांच्या छाननीसाठी तपासणी केली आहे.

रिझर्व्ह बँकेनें केलेल्या तपासणीमुळें तिला भारतांतील बँका कोणत्या परिस्थितींत चालू आहेत आणि कोणत्या पायावर सुधारणेच्या उपाययोजना आखणें जरूर आहे याची कल्पना करणें शक्य झालें आहे. या बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टरांच्या ताज्या वार्षिक अहवालांत असें म्हटलें आहे कीं या तपासणीवरून असें दिसून आलें आहे कीं या देशांतील बँकिंगपद्धति एकूणरीत्या भक्कम पायावर चालू असली तरी बँकिंगच्या सर्वमान्य नियमांचे दृष्टीनें विचार करतां येथील अनेक बँकांच्या कामकाजाच्या पद्धतींत सुधारणा करण्यास बराच वाव आहे.

तपासणीनंतर रिझर्व्ह बँकेनें केलेली उपाययोजना ती बँक भक्कम पायावर उभी राहण्यास बहुधा साह्यभूत होते. कांहीं बँकांकडून नियमितपणें अहवाल येण्याची आवश्यकता असते. याहून अधिक गंभीर स्वरूपाचे दोष असलेल्या बँकांचे बाबतींत एकीकरणाचा अगर पुनर्रचना करण्याची आणि ही उपाययोजना न्याय्य ठरणाऱ्यांचे बाबतींत त्यांचें नॉन-बँकिंग कंपनींत रूपांतर करण्याची सूचना देण्यांत येते. जून १९५२ अखेर रिझर्व्ह बँकेकडे ६ बँका मासिक आणि १३८ बँका तिमाही अहवाल पाठवीत होत्या.

### सतत जागरूकता

रिझर्व्ह बँकेची सतत जागरूकता आणि आपल्यांतील दोष काढून टाकण्याचे संबंधित बँकांचे सतत प्रयत्न यांमुळें अशा बँका भक्कम होण्यास आणि देशांतील एकूण बँकिंग पद्धतींत विश्वास निर्माण होण्यास मदत झाली आहे. पंजाब नॅशनल बँकेशीं भारत बँक लिमिटेडचें करण्यांत आलेलें अंशतः विलीनीकरण आणि पश्चिम बंगालांतील चार बँकांच्या एकत्रीकरणानें युनायटेड बँक ऑफ इंडियाची करण्यांत आलेली स्थापना, म्हणजे ठेवीदारांच्या हितसंबंधाचें रक्षण करण्याच्या प्रयत्नाचीं विशेष उदाहरणें होत.

### सुधारणा घडून आल्या

बँकेच्या कारभाराचा जरूर तो अनुभव असलेल्या योग्य नोकरवर्गाच्या अभावामुळेंच प्रामुख्यानें बँकिंगच्या व्यवहारांत मंदगतीनें सुधारणा होत आहे. बँकांच्या व्यवहारांत सर्वसाधारण सुधारणा झाल्या असल्यानें रिझर्व्ह बँकेनें अलीकडेच त्याबाबत केलेल्या मूल्यमापनावरून दिसून येतें. उदाहरणार्थ, आपल्या ठेवींपैकीं १० टक्क्यांहून कमी ठेवी सरकारी रोख्यांत गुंतविणाऱ्या बँकांची संख्या १९५१ मध्यें १२७ होती. १९४९ च्या अखेरीस ही संख्या २४३ होती. त्याचबरोबर सरकारी रोख्यांत ११ ते ३० टक्के या दरम्यानच्या प्रमाणांत आपल्या ठेवी गुंतविणाऱ्या बँकांच्या संख्येंत वाढ झाली. १९४९ च्या अखेरीस ही संख्या ९६ होती, ती १९५१ च्या अखेरीस वाढून १६४ वर गेली. त्याचप्रमाणें ठेवींपेक्षां अधिक रकमेचीं कर्जें दिलेल्या बँकांची संख्याही १९४९ ते १९५१ या कालावधींत १८४ वरून खालीं येऊन १५२ झाली. म्हणजे अशा बँकांनीं आपली याबाबतची परिस्थिति सुधारण्यासाठी कांहीं उपाययोजना केल्या. याच कालावधींत बँकांच्या कचेऱ्यांची संख्याहि ४,४४१ वरून घसरून ४,१७८ झाली.

अस्थिर धोरण आणि व्यवहार चालू ठेवणाऱ्या बँकांना प्रतिबंध करणारा प्रभावी उपाय म्हणून रिझर्व्ह बँकेच्या तपासणीच्या अधिकाराचा उपयोग होत आहे असेंच या सर्वसामान्य साध्य झालेल्या गोष्टींवरून दिसतें. परंतु रिझर्व्ह बँकेकडून होणारी तपासणी कोंडमारा करावा अगर दोष काढावेत अशा भावनेनें करण्यांत येत नसून, बँकांच्या परिस्थितींत सुधारणा होण्यासाठी योग्य मार्गासंबंधीं सूचना कराव्यात याच हेतूनें केली जाते. त्यांची परिस्थिति सुधारण्याच्या दृष्टीनें मिळणारें तज्ज्ञांचें मार्गदर्शन व साह्य याशिवाय अशा प्रत्येक बँकेला तपासणीमुळें इतरहि अनेक फायदे मिळतात. उदाहरणार्थ, दिलेले पैसे परत करावेत म्हणून आपल्या कर्जदारावर दडपण आणण्यासाठी बँकांना रिझर्व्ह बँकेच्या पत्रांचा उपयोग करतां येतो, आणि तसा तो नेहमीं केला जातो.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक लि.
( शिडयूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,१९,४८५
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.

॥ श्री ॥

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट
लिमिटेड, पुणें २.

— लोकमान्यांचें बोदवाक्य —
॥ मामनुस्मर युध्य च ॥

नवीन १००० टनांची सेमि–इलेक्ट्रिक मशिनरी उभी होऊन कंट्रोल दरानें सुमारें सत्तर लक्ष रुपयांची साखर चालू हंगामांत तयार झाली.

याचप्रमाणें पुढें दरवर्षी साखरेचें उत्पादन होत जाणार. वीरचें धरण होऊन आणखी दोन हजार एकरांस पाणी मिळालें म्हणजे उत्पादन आजच्यापेक्षां दुप्पट होणार.

साखरविक्रीच्या विलंबामुळें एक वर्ष मुदतीच्या नवीन ठेवी घेण्याचें ठरविलें आहे. सदर ठेवी हंगामाच्या साखर–विक्रींतून मुदतीप्रमाणें परत केल्या जातील. नवीन हंगाम नोव्हेंबरमध्यें सुरू होईल.

== शेअरविक्री सुरू आहे. ==

शेअर व ठेवीचे फॉर्म पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड,
पुणें २.
दि. १० सप्टेंबर १९५२.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे अँण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

### अपघाताच्या किंवा मृत्यूच्या तारांस सवलत

रस्ता, रेल्वे, कारखाने, आगी, महापूर, विजेचा धक्का, इमारत पडणें, वगैरे प्रकारच्या अपघातासंबंधी तसेंच माणसाची चिंताजनक परिस्थिति वा मृत्यु यांसंबंधीं तारा पाठविण्यासाठी पोस्ट व तार खात्यानें खाजगी तारांचा एक खास वर्ग काढला आहे. अशा परिस्थितींत सांपडलेल्या लोकांना " तांतडीच्या तारा " पाठवितां येऊन त्यांची सोय व्हावी म्हणून हा वर्ग काढला आहे. या तारांचें हें वर्गीकरण असून एक्स्प्रेस तारांपेक्षांही त्या आर्धी पाठविल्या '×××' जातात. एक्स्प्रेस तारा इतकाच या तारांवर आकार घेतला जातो आणि तार पाठविणाऱ्या इसमास फक्त अपघातांत सांपडलेल्या इसमाची अगर इसमांची स्थिति अगर आजार यांचाच उल्लेख करतां येईल. तसेंच नातलग अगर मित्र यांना हजर राहाण्याबाबतही त्याला विनंती करतां येईल. इतर तारांप्रमाणेंच उत्तर मागविण्याची अगर तार अनेक पत्त्यांवर पाठविण्याची खास व्यवस्था अशा प्रकारच्या तारांसाठीहि केलेली आहे.

---

### फल-वृक्ष-आरोपण

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें या संस्थेच्या विद्यमानें भाऊमहाराज बागेंत फल-वृक्ष-आरोपणाचा कार्यक्रम जंगल व शेती विभागाचा एक नवीन उपक्रम म्हणून करण्यांत आला. या शिक्षणाच्या कार्यक्रमासाठी श्रीमंत जगन्नाथ महाराज पंडित यांनीं आपली टिळक-स्मारक-मंदिराच्या आवारांतील जागा वापरावयास दिली. शिवाजी मराठा सोसायटीच्या गांधी ट्रेनिंग कॉलेजनें ८० विद्यार्थी पाठविले होते. या विद्यार्थ्यांना नित्याच्या अभ्यासक्रमांत "शेती" हा विषय बेसिक अथवा मूलोद्योगासाठी आहे. या कामीं पुणें येथील एम्प्रेस बोटॅनिकल गार्डन्स् या संस्थेनें आपलेकडील नारळ, चिक्कू, वगैरे उत्तमोत्तम कलमें संस्थेच्या कार्यास मदत म्हणून देणगीदाखल दिलीं होतीं. वृक्षारोपणाचा प्रयोग संस्थेच्या शेती-शिक्षण-तज्ज्ञांचे देखरेखीखालीं चालविण्यांत आला.

---

### व्हिलेज इंडस्ट्रीज कमिटीकडे निरा-योजनेचें काम

निरा-योजनेचें काम बाँबे स्टेट व्हिलेज इंडस्ट्रीज कमिटीकडे वर्ग करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. चालू वर्षाच्या त्या कामाच्या आखणीचा तपशील कमिटी लवकरच ठरवील.

---

**सीलोनला तांदुळाचें कर्ज**—भारतीय सरकारनें सीलोनला ७,५०० टन तांदूळ कर्जाऊ दिला आहे. सीलोनला ब्रह्मदेशाकडून मिळणारा तांदूळ आल्यावर सीलोन हा तांदूळ परत देणार आहे. तांदुळाची ने-आण मुंबई बंदरांतून करावयाची ठरली आहे.

**उत्तर प्रदेशांतील मद्यपान**—उत्तर प्रदेश सरकारचे अबकारी मंत्री श्री. अली झहीर ह्यांनीं अशी माहिति सांगितली कीं राज्यांतील परदेशी दारूचा खप गेल्या सहा वर्षांत ८२ टक्क्यांनीं कमी झाला आहे. भांगेच्या खपांत मात्र ६.३ टक्क्यांनीं वाढ झालेली आहे.

**अफगाणिस्तानचें पहिलें सार्वजनिक कर्ज**— अफगाणिस्थानच्या सरकारनें आपल्या इतिहासांतील पहिलेंच सार्वजनिक कर्ज काढण्याचें ठरविलें आहे. १ कोटी 'अफगाणी' चे बाँडस काढण्यांत आले आहेत. कर्जावर ७ टक्के व्याज देण्यांत येईल.


# मध्यप्रदेश को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना-१९११

हेड ऑफिस-नागपूर शहर (टिळक पुतळयाजवळ)

**अध्यक्ष-सर माधवराव देशपांडे के. बी. ई.**

मध्यप्रदेशांतील सहकारी चळवळीच्या केन्द्रस्थानीं असलेली व कित्येक वर्षें लोकादरास व ठेवीदारांच्या विश्वासास पात्र झालेली

**एकमेव प्रादेशिक सहकारी बँक**

शाखा : सिताबर्डी-नागपूर, अमरावती, खामगांव, मलकापूर, बुलढाणा, चांदा, बैतूल, इटारसी, हरदा, पिपारिया, नरसिंगपूर, जबलपूर, मंडला व राजनांदगांव.

★

| | | |
|---|---|---|
| अधिकृत हिस्से-भांडवल | रु. | २०,००,००० |
| जमा झालेलें हिस्से-भांडवल | रु. | १०,९७,००० |
| गंगाजळी | रु. | १४,५१,००० |
| एकूण ठेवींची रक्कम | रु. | २,१५,५५,००० |
| सरकारी रोखे | रु. | ७२,९१,००० |

खेळतें भांडवल रु. ३ कोटींचे वर.

आर्थिक दृष्ट्या पूर्ण सुरक्षित !

आकर्षक व्याजाचे दर !!

सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात !!!

— व —

इतर सर्व बँकिंगचे व्यवहार करण्यांत येतात !!!!

★

मागील सहा वर्षांपासून हिस्स्यांवर ५ टक्के " इनुकमटॅक्स माफ " मुनाफा वांटण्यांत येत आहे.

**आपल्या मूल्यवान् वस्तू व दागिने आमच्या "सेफ डिपॉझिट व्हॉल्ट" मध्यें ठेवून निर्धास्त व्हा.**

वैयक्तिक तिजोऱ्यांची (Lockers) व्यवस्था केली आहे.

सविस्तर माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें

★

आमच्या भागीदारांस व ठेवीदारांस ही दिवाळी सौख्याची व भरभराटीची जावो.

नि. स. देव,
मॅनेजर.

**१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन**

**१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.**

# वे स्ट र्न इं डि या

**विमा कंपनीनें**

**आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा**

यासंबंधीची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

**दर हजारी त्रैवार्षिक बोनस**

| ह्यातींतील पॉलिसी | ह्यातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी

**वेस्टर्न इंडियाची निवड करा.**

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.

मॅनेजर

# वेस्टर्न इंडिया लाईफ

## इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

| शाखा कचेरीः— | शहर | कँप |
|---|---|---|
| | १७९ बुधवार पेठ, | केअर–ऑफ क्रेसवेल्स |
| | लक्ष्मीरोड, पुणें. | ईस्ट स्ट्रीट, पुणें–१ |

फोन नंबर— ३४०२

# बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

## –संचालक मंडळ–

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D.
संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर–चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेव : १ वर्ष ३ टक्के, ५ वर्षे ४ टक्के.

एक वर्षापेक्षां कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस :
४५५ रविवार, पुणें २.

गो. गं. साठे,
मॅनेजर.

# दि सांगली बँक लिमिटेड

## सांगली

(स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक)

## मुख्य ऑफिस : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | रुपये ४,५०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटी |

**: शाखा :**

मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज.

**सांगली येथें सेफ् डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. एस्. ई. सुखटणकर, D. F. C., I. A. S. (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. शांतीनाथ बाबुराव आरवाडे, B. A., (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

**पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३**

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें–चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरिज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.